साप्ताहिक
# सत्याचा शिलेदार

आतील पानात

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यास जगाने स्वीकारले : प्रा. नितेश रायकर

विशेषांक RNI: R.N.I No.MAHMAR/2021/51412 | शनिवार दि. ४ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | किंमत : ५ रु

# पळालेले पितळ जाईल, पण सोनं टिकेल

## उद्धव ठाकरे : दसरा मेळाव्यात शिंदे गटासह भाजपवर नाव न घेता धारदार हल्ला

**मुंबई : पळवलेले ते पितळ होतं, पण माझ्याकडे उभं असलेलं शिवसैनिकांचं सोनं आजही शुद्ध आहे आणि कायमच तसंच राहील, अशा शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांप्रती असलेली निष्ठा अधोरेखित केली. दसऱ्याच्या पारंपरिक मेळाव्यात त्यांनी शिंदे गटासह भाजपवर नाव न घेता धारदार हल्ला चढवला.**

शिवाजी पार्क, दादर येथे हजारोंच्या साक्षीने पार पडलेल्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांचे भाषण म्हणजे एक प्रकारे आगामी महापालिका निवडणुकीचा बिगुलच ठरला. पावसाच्या सरी झेलत जमलेले कट्टर शिवसैनिक, भगवे झेंडे आणि जयजयकारांच्या गजरात ठाकरे यांचे भाषण रंगात आले. भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी उपस्थित शिवसैनिकांचे कौतुक करत म्हटले, तुम्ही पावसात भिजला आहात, पण तुमचं मन अजूनही पेटलेलं आहे. हाच खरा वारसा आहे बाळासाहेबांचा!

ठाकरे यांनी भाजपवर गंभीर आरोप करत म्हटले, आजच्या राजकारणात विचार, तत्वं, आंदोलनं हरवली आहेत. आता फक्त पैशाचा खेळ सुरू आहे. निवडणुका म्हणजे मतांचा बाजार झाला आहे. सत्तेसाठी काहीही करणं हे नवं सूत्र झालं आहे.

मुंबई महानगरपालिकेबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, मुंबई अडानीच्या हवाली करण्याचा कट रचला जात आहे. महानगरपालिका




**शिवाजी पार्क, दादर येथे हजारोंच्या साक्षीने पार पडलेल्या मेळाव्यास मार्गदर्शन करताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे.**

जिंकण्यासाठी केंद्र सरकारची यंत्रणा लावत आहेत. हे आपण थांबवलं पाहिजे.

तसेच, त्यांनी भ्रष्टाचाराचे संकेत देत पांढऱ्या कागदांवर लवकरच मोठा खुलासा करणार आहे, असं सांगून सत्ताधाऱ्यांच्या चिंतेत भर घातली.

भाजपकडून यावर त्वरित प्रतिक्रिया आली. राज्याचे राजस्व मंत्री चंद्रशेखर बावनकुले यांनी ठाकरे यांच्या भाषणावर टीका करत, हा एक पराभूत मानसिकतेचा आवाज आहे. जनतेनं त्यांना नाकारलं आहे, असे वक्तव्य केले.

# भारतीय लोकशाहीवर संकट

## राहुल गांधी यांचा इशारा, भाजपची तीव्र प्रतिक्रिया

**कोलंबिया :** माजी काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी कोलंबियातील ईआयए विद्यापीठात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना भारतातील लोकशाही संस्थांवर सत्ताधारी पक्षाच्या दबावाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी सरकारच्या धोरणांमुळे भारतीय लोकशाही संकटात असल्याचा इशारा दिला आणि हे दबाव 'लोकशाहीवर मोठा हल्ला' असल्याचे म्हटले.



राहुल गांधींनी भारता-तील विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि मतभेदांना सन्मान देणाऱ्या लोकशाही व्यवस्थेला धोका पोहचत असल्याचे सांगितले. तसेच, २०१६ मधील नोटाबंदी आणि वस्तू व सेवा कर (GST) लागू करण्याच्या निर्णयांमुळे लहान आणि मध्यम उद्योगांना गंभीर नुकसान झाले असल्याचा उल्लेख त्यांनी केला. त्यांच्या मते, भारतातील लोकशाही ही जगातील सर्वात (पान २ वर)

# शेतीसाठी मोठी घोषणा : पोटे उत्पादनात भारत स्वयंपूर्ण होणार

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने देशातील पोटे उत्पादन वाढवण्यासाठी मोठा निर्णय घेत 'राष्ट्रीय पोटे उच्ची मिशन' (Mission for atmanirbharta in Pulses) मंजूर केला आहे. या मिशनचा कालावधी २०२५ ते २०३१ असा असून, ₹११,४४० कोटींचा खर्च केंद्र सरकार करणार आहे.



या योजनेद्वारे देशाला पोट्यांच्या बाबतीत पूर्णपणे आत्मनिर्भर बनवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. सध्या भारत मोठ्या प्रमाणावर तूर, उडद, मसूर यांसारख्या पिकांची आयात करतो. आता या योजनेद्वारे ३५० लाख टन उत्पादन घेण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यासाठी ३५ लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणले जाणार आहे.

शेतकऱ्यांना मोफत बियाणे किट्स, प्रशिक्षण, आणि किमान आधारभूत किंमत (MSP) वर हमीखरेदी मिळणार आहे. तसेच, प्रक्रिया व साठवण सुविधा, पॅकेजिंग युनिट्स उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

बियाण्यांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी 'साथी' (STHI) पोर्टल सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे पिकांचे उत्पादन वाढेल, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि देशाची आयातीवरील अवलंबन कमी होईल, असा विश्वास कृषी मंत्रालयाने व्यक्त केला आहे.

# क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने डॉ. दत्तात्रय घुगरे सन्मानित

**पेठ वडगाव :** येथील स्वातंत्र्यसैनिक मारुती गणपती पाटील आदर्श विद्यानिकेतन अँड ज्युनिअर कॉलेज, मिणचे मुख्याध्यापक डॉ. दत्तात्रय श्रीधर घुगरे यांना महाराष्ट्र शासनाच्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार व शालेय शिक्षण मंत्री मा. श्री. दादाजी भुसे यांच्या हस्ते झालेल्या मुंबई येथे झालेल्या भव्य सोहळ्यात हा मानाचा पुरस्कार डॉ. घुगरे यांना प्रदान करण्यात आला.



**मुंबई येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.श्री अजितदादा पवार व शालेय शिक्षण मंत्री मा.श्री. दादा भुसे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. दत्तात्रय घुगरे.**

या वेळी विद्यालयाच्या सचिव व मुख्याध्यापिका सौ. एम. डी. घुगरे, पर्यवेक्षक एस. जी. जाधव, प्रा. चंद्रकांत बागणे, डॉ. शिवराज घुगरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

डॉ. घुगरे यांच्या नेतृत्वाखाली शाळेत एक लाख चार हजार चारशे चाळीस सूर्यनमस्कारांचा विक्रमी उपक्रम, ५५५ विद्यार्थ्यांसह शिवचरित्र पारायण, तसेच ११११ विद्यार्थ्यांसह संविधान पारायण असे असामान्य व प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४२३ राष्ट्रीय, २७९० राज्यस्तरीय व ४६७० जिल्हास्तरीय खेळाडू घडले असून, ते राज्यस्तरीय अभ्यासक्रम समितीचे तज्ज्ञ सदस्य म्हणूनही कार्यरत राहिले आहेत.

शिक्षणासोबत सामाजिक कार्यातही त्यांची विशेष आघाडी राहिली आहे. त्यांनी अनेक गरजू, गरीब व अनाथ विद्यार्थ्यांना दत्तक घेत त्यांचे शिक्षण विनामूल्य केले आहे. हजारो वृक्षांची लागवड, पर्यावरण संवर्धन, तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदतकार्य हे त्यांचे समाजोपयोगी कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

त्यांच्या नेतृत्वाखालील संस्थेने मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धेत जिल्हा व राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी बजावली. (पान २ वर)

# राष्ट्रसेवा व समाजाभिमुख कार्य हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य

## माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे प्रतिपादन

**नागपूर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी विजयादशमी मेळाव्यात माजी राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद यांनी आपल्या मनोगतात राष्ट्रसेवा आणि समाजाभिमुख कार्य हा प्रत्येक नागरिकाचा प्रमुख कर्तव्य असल्याचे ठळकपणे सांगितले. त्यांनी संघाच्या देशसेवेतील योगदानाचे कौतुक केले आणि समाजाच्या सर्व स्तरांवर एकत्रितपणा वाढवण्याचे आवाहन केले.

या मेळाव्याला संघ प्रमुख मोहन भागवत आणि हजारो स्वयंसेवक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामनाथ कोविंद यांनी म्हटले की, राष्ट्रीय सेवा ही फक्त शासनाचे काम नसून ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी

(पान २ वर)




# ऑक्टोबरमध्ये मुसळधार पावसाचा इशारा

## ५० वर्षांचा विक्रम तुटण्याची शक्यता? : शेतकऱ्यांची चिंता वाढली

**मुंबई (प्रतिनिधी गणेश सुतार) :** सप्टेंबर महिन्यात सुरू झालेल्या परतीच्या पावसामुळे देशातील अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली होती. महाराष्ट्रातील मराठवाड्यासह इतर भागांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतीसह मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने (IMD) ऑक्टोबर महिन्याबाबत अधिक चिंताजनक



माहिती दिली आहे. ऑक्टोबर महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा ११५ टक्के अधिक पाऊस पडण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी वर्तवला आहे. एवढाच नव्हे, तर या पावसामुळे गेल्या ५० वर्षांचा पावसाचा विक्रम तुटू शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. (पान २ वर)

### सतर्कतेचा इशारा

ऑक्टोबर महिना हा पिकांच्या कापणीचा हंगाम असल्यामुळे, अशा वेळी पडणाऱ्या पावसामुळे भात, मका, सोयाबीन यांसारख्या प्रमुख पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. शेतात पाणी साचल्यास पिके कुजण्याचीही भीती आहे.


# दोन वर्षांखालील मुलांना कफ सिरप देण्यास बंदी

## केंद्र सरकारची नवीन मार्गदर्शक तत्त्वे जाहीर

**नवी दिल्ली :** लहान मुलांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले असून, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी कफ सिरप आणि सर्दीवरील औषधांच्या वापराबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

या नव्या सूचनांनुसार, दोन वर्षांखालील मुलांना कोणतेही कफ सिरप अथवा सर्दीवरील औषध देणे टाळावे, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. तसेच, पाच वर्षांखालील मुलांसाठी देखील ही औषधे सामान्यतः शिफारस केलेली नाहीत, कारण लहान वयात सर्दी-खोकल्यासारखे आजार नैसर्गिकरित्या बरे होतात.

मंत्रालयाने आरोग्य कर्मचाऱ्यांना आणि बालरोग तज्ज्ञांना ही औषधे वापरताना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे निर्देश दिले आहेत. प्राथमिक उपचारांसाठी नैसर्गिक उपायांना - जसे की भरपूर पाणी पिणे, पुरेशी विश्रांती घेणे, वाफ घेणे इत्यादींना प्राधान्य देण्याचा सल्ला



देण्यात आला आहे.

औषधोपचार अत्यावश्यक असल्यास, केवळ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच औषधे देणे आणि ती देखील योग्य डोस आणि निश्चित कालावधीपुरतीच असावी, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. तसेच, एकाच वेळी अनेक औषधे न देण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असेही स्पष्ट करण्यात आले आहे की, फक्त ऋ्वझ प्रमाणित आणि उच्च दर्जाची कफ सिरप खरेदी करावी. यामुळे औषधांची गुणवत्ता आणि सुरक्षितता सुनिश्चित करता येईल. या नव्या सूचनांची अंमलबजावणी सर्व शासकीय दवाखाने, जिल्हा रुग्णालये, आरोग्य केंद्रे, वैद्यकीय शिक्षण संस्था आणि औषध वितरण केंद्रांमध्ये तातडीने करावी, असे आदेश केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत.

## संपादकीय

### मानवीयतेच्या अस्तित्वाचा प्रश्न

*२०२५ चा पावसाळा महाराष्ट्रासाठी केवळ एक ऋतू नव्हता, तर एक असहाय्यतेचा प्रचंड महापूर ठरला. अविरत पडणाऱ्या पावसाने शहरे, गावे, शेतं, घरं, आणि त्याहूनही अधिक – लोकांची स्वप्नं, हक्क, आणि जगण्याची उर्मी पाण्याखाली नेली. आता या चिखलात केवळ भिंतींच्या ढिगाऱ्यांपेक्षा जास्त काही गाडलं आहे.*

*मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण – कुठेही पाहिलं तरी परिस्थिती एकच आहे. शेतात पाणी साचलेलं, शेतकरी उभं पिकं गमावून हातात रिकामा बोळा घेऊन बसलेला, त्याच्या आजूबाजूला रडणारी बायको, भुकेल्या मुलांचे डोळे आणि नकोसं झालेलं आभाळ. नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव परिसरात १३,००० हेक्टरहून अधिक शेतीवर अतिवृष्टीचं वणव्यासारखं संकट आलं. औरंगाबाद, नांदेड, बीड, धाराशिव, लातूर या भागात मृत्यूचं आकडं वाढत गेलं. काहींच्या घरांचं छप्पर वाहून गेलं, काहींच्या घरात मृतदेह उरला. हाच पाऊस सोलापूरमध्ये झोपडपट्ट्यांमध्ये इतका घुसला की लोकांना छप्पर गमावून शाळेच्या इमारतीत आसरा घ्यावा लागला. आरोग्याची साधनं कोलमडली, वीज गेली, पाण्याच्या नळांमधून गढूळ पाणी यायला लागलं, आणि शासनाच्या मदतीच्या गाड्या मात्र कुठंही दिसल्या नाहीत.*

*सरकारकडून आकड्यांची पाटी मात्र गाजवली गेली – ₹२,२१५ कोटींचं मदत पॅकेज, ३१ ऑक्टोबरपर्यंत पंचनाम्यांची मुदतवाढ, NDRF/SDRF यंत्रणांची नियुक्ती, अन्नधान्य आणि आरोग्य सुविधा यांचे आदेश. हे सगळं कागदावर अतिशय चकचकीत दिसतं, पण जेव्हा बीड जिल्ह्यातील शेतकरी सांगतो की, तिघं अधिकारी येऊन फोटो काढून गेले, पण हातात अजून काहीच नाही, तेव्हा हे सगळं केवळ व्यवस्थेचा दिखाऊ ढाचा असल्याचं स्पष्ट होतं.*

*सरकारने मदतीचा निर्णय घेतलाय, लवकरच पोहोचेल, हे शब्द आता लोकांसाठी फार पूर्वीचे झाले आहेत. शेतकऱ्यांना पिक विमा हवा आहे, पण विमा कंपनीने 'हे नुकसान नैसर्गिक असून त्याचा समावेश पॉलिसीत नाही' असं सांगितल्यावर सरकारने तोंड बंद केलं. कापूस आणि सोयाबीन यासारख्या नगदी पिकांचं नुकसान झाल्यावर अनेक शेतकऱ्यांनी दुसरं काही काम करण्याचा विचार केला. पण गावं पाण्यात, शहरं बेर–ोजगारीने भरलेली, आणि सरकारी योजनेच्या दारात उभा असलेला शेतकरी अजूनही फॉर्म भरतोय, काहीतरी मिळेल या आशेवर.*

*या परिस्थितीत सर्वात मोठं दुःख म्हणजे लोकांचं आत्मसन्मान हरवणं. घर गमावलेला माणूस दोन पोती तांदूळ घ्यायला लाजतो, कारण सरकारने त्याला भिक मागायला लावलंय. आणि जे मंत्री गावात फिरतात, ते केवळ फोटोसाठी येतात, अशा तक्रारी आता सामान्य झाल्या आहेत. ते फक्त हेलिकॉप्टरनं येतात आणि कॅम ेऱ्यासमोर उभं राहतात, असं अनेकांनी अगदी उघडपणे म्हटलं आहे. हे सगळं ऐकून एकच प्रश्न निर्माण होतो – शासन ही संस्था केवळ निवडणूक जिंकण्यासाठी आहे का, की संकटात लोकांच्या पाठीशी उभं राहण्यासाठी?*

*अशा वेळी पत्रकारितेचं कर्तव्य अजून वाढतं – आम्ह–ाला फक्त प्रश्न विचारायचे नाहीत, तर सत्तेच्या दरबारापर्यंत लोकांचा आक्रोश पोहोचवायचा आहे. म्हणूनच सत्याचा शिलेदार म्हणून आम्ही सरकारला थेट विचारतो – म दतीची घोषणा झाली, आता प्रत्यक्ष मदत केव्हा? बँक खात्यांमध्ये पैसे कधी येणार? जिने घर गमावलं, तिला पुन्हा छप्पर कधी मिळणार? जी बाई नवऱ्याचा मृत्यू पाहून चिखलात बसली आहे, तिच्यासाठी शासनाकडे संवेदना आहेत का?*


*हे सरकारची परीक्षा आहे – केवळ तांत्रिक मदतीची नाही, तर माणुसकीची परीक्षा. आणि जर हे सरकार ती परीक्षा पास होऊ शकत नसेल, तर त्याचं अपयश हा केवळ राजकीय विषय नाही, तर मानवीतेच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. शेवटी, पावसाच्या थेंबांसारखेच अश्रूही आवाज करत नाहीत, पण ते मातीला अधिक ओली करतात. ही माती, ही भिजलेली जमीन, ही माणसं आणि त्यांची वेदना – यांचं ओझं हलकं करायला जर राज्य सरकार अजूनही जागं नसलं, तर इतिहास त्यांना माफ करणार नाही.*

***लेखन : प्रशांत भोसले***

## भारतीय लोकशाहीवर संकट

**(पान १ वरून)** मोठी आणि बहुविध लोकशाही आहे, जी विविधतेला संधी देते, मात्र सध्याच्या धोरणांमुळे तिचे अस्तित्व संकटात आहे.राहुल गांधींच्या या वक्तव्यावर भाजपने तीव्र प्रतिक्रिया दिली असून, त्यांनी राहुल गांधी यांना परदेशात जाऊन देशाच्या लोकशाहीबाबत नकारात्मक विधान करणे थांबवण्याचा सल्ला दिला. भाजपने राहुल गांधी यांना 'प्रचाराचा नेता' म्हणत त्यांच्या विधानाचा निषेध केला आहे. राजकीय वर्तुळांत या मुद्द्यावर जोरदार चर्चा सुरु असून, काही विश्लेषक राहुल गांधींच्या चिंतेला महत्त्व देतात, तर काही लोक सरकारच्या धोरणांवर विश्वास ठेवतात आणि या आरोपांना नाकारतात.

# महाराष्ट्रातील प्राचीन आणि आद्य साडेतीन शक्तिपीठे



### महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर

हे मंदिर देवीच्या १०८ शक्तिपीठांपैकी एक असून, महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी एक पूर्ण पीठ मानले जाते. राष्ट्रकूट किंवा शिलाहार राजांच्या काळात, अंदाजे इ.स. ६००–७०० मध्ये या मंदिराचे बांधकाम झाले. देवीची मूर्ती ४० किलो वजनाची असून, शेंदूर लावलेली, मुकुटधारी आणि सिंहासनी विराजमान आहे. महालक्ष्मी ही भगवान विष्णूची पत्नी मानली जाते. संभाजी महाराजांनी मंदिराचा जीर्णोद्धार १७१५–१७२२ दरम्यान केला होता.



### श्री तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर

हे सर्वात प्राचीन आणि आद्य पीठ मानले जाते. तुळजाभवानी देवी भोसले घराण्याची कुलदेवता असून, शिवाजी म हाराजांना भवानी तलवार देणारी हीच देवी होती, असे मानले जाते. मंदिर डोंगरावर वसलेले असून, काही भाग हेमाडपंती शैलीत बांधले आहेत. नवरात्र महोत्सव येथे २१ दिवस साजरा होतो. देवीने दुष्टांचा नाश करून धर्माची स्थापना केली, असे पुराणात सांगितले आहे. दरवर्षी या मंदिराला लाखोंच्या संख्येने भेट देऊन दर्शन घेत असतात.



### श्री रेणुकादेवी मंदिर, माहूर

हे पूर्ण शक्तिपीठ असून, परशुरामाची माता रेणुकामाता येथे पूजली जाते. मंदिराचे बांधकाम यादव राजांनी १३व्या शतकात केले. देवीच्या दर्शनाची पार्श्वभूमी परशुरामाच्या शोकातून निर्माण झालेली आख्यायिका भाविकांमध्ये प्रसिद्ध आहे. येथे दत्तात्रेय व परशुराम यांची मंदिरेही आहेत. महाराष्ट्र आणि अन्य राज्यातील लाखो कुटूंबांची ही देवी कुलदैवी आहे. पूर्ण वर्षभर हे मंदीर भाविकांनी गजबजलेले असते. दरवर्षी कोट्यवधी भाविक मंदीराला भेट देत असतात.



### सप्तशृंगी देवी, नाशिक

हिला अर्धे पीठ म्हणून ओळखले जाते. देवी सप्तशृंगगडाच्या सात शिखरांमध्ये वसलेली आहे. महिषासुर मर्दिनी म्हणून तिची ख्याती आहे. देवीची अठरा भुजांची आठ फूट उंच मूर्ती डोंगराच्या कपारीत कोरलेली आहे. येथे ब्रह्मस्वरूपिणी, महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वतीचे त्रिगुणात्मक रूप मानले जाते. महाराष्ट्र आणि अन्य राज्यातील लाखो भाविकांचे ही आराध्यदेवी आहे. यामुळे दरवर्षी लाखोंच्या संख्येने मंदीराला भेट देऊन देवीचे दर्शन घेत असतात.

**लेखन : डॉ.उमेश सुतार ज्योतिषाचार्य**



## संभाजीराव माने गर्ल्स हाय. व ज्युनि. कॉलेजमध्ये शास्त्री व गांधी जयंती

**रुकडी : प्रतिनिधी** बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट संचलित संभाजीराव माने गर्ल्स हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, रुकडी येथे स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य सौ. मीनाक्षी निकम यांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून स्वच्छता अभियानांतर्गत तंबाखूमुक्त अभियान राबविण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी तंबाखू, गुटखा यांसारख्या व्यसनांपासून दूर राहण्याचा शपथ घेतला.

प्राचार्य सौ. मीनाक्षी निकम यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आजची तरुण पिढी तंबाखू व गुटखा यांसारख्या व्यसनामुळे त्रस्त होत आहे. म्हणून प्रत्येकाने समाजाच्या घटक म्हणून अशा नकारात्मक गोष्टींपासून दूर राहणे गरजेचे आहे, असे आवाहन केले. हा कार्यक्रम सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत पार पडला.

## राष्ट्रसेवा व समाजाभिमुख कार्य हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य

**(पान १ वरून)**

आहे. संघाने आपल्या कार्यातून समाजात एकात्मता आणि अनुशासन यांचे मूळ जपले आहे. या भूमिकेमुळे संघाला देशाच्या विकासात अनमोल स्थान प्राप्त झाले आहे.

मोहन भागवत यांनी संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या भाषणात संघाच्या आदर्शांची महती अधोरेखित करत, संघ हा भारतीय संस्कृतीचा आणि राष्ट्रीयतेचा जीवंत पुरावा आहे. पुढील शताब्दीही संघाच्या मूल्यांवर आधारित राहील, असे सांगितले. त्यांनी संघ कार्यकर्त्यांना देशभक्ती, सामाजिक समरसता आणि विकासासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात संघाच्या पारंपरिक पोशाखात हजारो स्वयंसेवकांनी पथसंचालन, योगाभ्यास, शस्त्रपूजन आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. संघाच्या या शताब्दी विजयादशमी मेळाव्याने राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश अधिक प्रभावीपणे दिला.

परदेशी प्रतिनिधी आणि धर्मगुरूंनी संघाच्या जागतिक कार्याचा गौरव करत शताब्दी वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. संघाने या शताब्दी वर्षात देशभर विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने डॉ. दत्तात्रय घुगरे सन्मानित

(पान १ वरून)

याशिवाय डॉ. घुगरे हे अनेक शैक्षणिक व क्रीडा संस्थांवर पदाधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांनी केलेल्या कार्याची दखल शासनाने घेतली आहे.

त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या या राज्यस्तरीय सन्मानाने त्यांचा गौरव करण्यात आला आहे.



**कोल्हापूर : भवानी मंडपातील तुळजाभवानी मंदिरात संयोगिताराजे छत्रपती विधीवत ओटी डॉ. अमितकुमार भोसले यांना देताना.**

## रुकडीतील प्राचीन श्री अंबाबाई मंदिरात छत्रपती घराण्याकडून पारंपारिक पद्धतीने ओटी अर्पण

**रुकडी, ता. हातकणंगले :** येथील प्राचीन श्री अंबाबाई मंदिरात यावर्षीही शारदीय नवरात्र उत्सवांतर्गत पारंपरिक पद्धतीने छत्रपती घराण्याकडून ओटी अर्पण सोहळा पार पडला.

या वेळी संयोगिताराजे संभाजीराजे छत्रपती यांच्या वतीने राजेशाही खना–नारळाची ओटी, हार आणि हळद–कुंकू विधीवत मंदिर जीर्णोद्धार समिती व चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अमितकुमार भोसले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोल्हापूर संस्थानाकडून शतकानुशतके अखंडितपणे चालत आलेली ही परंपरा काही काळ थांबली होती; मात्र सन २०२४ पासून ती पुन्हा सुरु करण्यात आली आहे. ही परंपरा आजही छत्रपती घराण्याद्वारे जपली जात असल्याचा मान आहे.

कोल्हापूर येथील भवानी मंडपातील तुळजाभवानी मंदिरातून छत्रपती घराण्याकडून विधीवतरीत्या खना–नारळाची ओटी आणि हळदी कुंकू रुकडीच्या अंबाबाई चरणी अर्पण करण्यात आली.

सदर ओटी ग्रामस्थांच्या उपस्थितीत सवाद्य मिरवणुकीसह अंबाबाई मंदिरात अर्पण करण्यात आली. या परंपरेमुळे रुकडीच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाचा जपणूक होत आहे, अशी भावना रुकडी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## न्यू इंग्लिश स्कूल कवठे एकंदमध्ये खंडेनवमी शस्त्र पूजा उत्साहात

सांगली (जिल्हा प्रतिनिधी अशोक मासाळ) : दि हिंद एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल कवठे एकंद येथील पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम कार्यशाळेमध्ये आज खंडेनवमीच्या निमित्ताने शस्त्र पूजा संपन्न झाली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सुधीर शिंदे सर यांचे हस्ते कार्यशाळेमध्ये शस्त्र पूजा करण्यात आली. तसेच तंत्र विभागाचे प्रमुख श्री पिसे सर भांडारपाल श्री चव्हाण सर यांनीही शस्त्र पूजा केली.

याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेमध्ये उपस्थित होत्या व त्यांनी या शस्त्र पूजा कार्यक्रमाची शोभा वाढवली.

विद्यालयाचे कनिष्ठ लिपिक श्री. रंगराव भोसले सर यांनी सर्वांना पेढे देऊन हा आनंद साजरा केला.



## ऑक्टोबरमध्ये मुसळधार पावसाचा इशारा

**(पान १ वरून)** सामान्यतः ऑक्टोबर महिन्यात मान्सूनची तीव्रता कमी होत जाते, मात्र यंदा सप्टेंबर महिन्यात मान्सून अधिक सक्रिय राहिला. अनेक भागांत अजूनही आर्द्रतेचं प्रमाण जास्त असून, त्यामुळे ऑक्टोबरमध्येही पावसाची शक्यता वाढली आहे.

### यंदाच्या महापुरात संपूर्ण व्यवस्थेचा मृतदेह सापडला...

यंदा पाऊस फारच झाला,
घरं, शेतं, रस्ते वाहून गेले,
लोकांचं आयुष्य उघड्यावर आलं,
पण सरकारचं लक्ष कुठं गेलं?

कोणी छप्पर गमावलं,
कोणी संसार गमावला,
भूक लागली तरी अन्न नाही,
औषधाला हात जोडूनही दवाखाना नाही.

शाळेत आसरा घेतला,
पण शाळा कुठं उरली?
पाण्यात वहिल्या पुस्तकांसोबत
पोरांची स्वप्नंही वाहून गेली.

सत्ताधारी एकमेकांवर दोष टाकतात,
विरोधक भाषणं करतात,
मदतीच्या गप्पा रंगतात,
पण हातात काहीच येत नाही.

कोणी म्हणतं पंचनामा सुरू आहे,
कोणी म्हणतं तपास चालू आहे,
लोक विचारतात –
पण मदत कधी येणार आहे?

लोक अजूनही चिखलात अडकलेत,
आणि नेते अजून खुर्ची सांभाळतायत...

या पावसात फक्त घरं नाही गडप झाली,
फक्त जीवन नाही वाहून गेलं –
तर या मानवतेच्या ढिगाऱ्याखाली,
संपूर्ण व्यवस्थेचा मृतदेह सापडला!

**कवी : प्रशांत भोसले**

सत्याचा शिलेदार हे साप्ताहिक प्रिंटर प्रकाशनाचे मालक आणि संपादक आहेत. प्रशांत सुरेश भोसले. श्री. महालक्ष्मी ऑफसेट. श्री. पो. करवीर जिल्हा कोल्हापूर येथे छापलेले. महाराष्ट्र रुकडी ता. हातकणंगले जिल्हा. कोल्हापूर येथे प्रकाशित. ४१६११८. मो.क्र.– ७५१७६२३०३० / ९५०३६४५८०३. आर.एन.आय. क्रमांक महामर/२०२१/५१४१२, क्रमांक डेस्क/७/होम/एन.पी. एस.आर/२९/२०२



## रुकडीतील ऑक्सीजन पार्कला जगद्गुरूंची भेट

**रुकडी : प्रतिनिधी**

निसर्गसंवर्धन आणि पर्यावरण जपण्याच्या ध्यासातून कार्यरत असलेल्या रुकडी येथील आधार फाउंडेशनने उभारलेल्या ऑक्सीजन पार्कला नांदणी येथील संस्थान मठाचे प.पू. जगद्गुरू स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांनी मान्यवर भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

सन २०१० पासून आधार फाउंडेशनने रुकडी रेल्वे स्टेशनजवळ ५६ प्रजातींच्या सुमारे ३,५०० झाडांची लागवड करून वृक्षसंवर्धनाचे उत्तम कार्य केले आहे. या झाडांमध्ये जारुळ, कडुलिंब, वड, पिंपळ, आवळा, चिंच, जांभूळ, करंजी, पाडळ, कणेरी, हिरडा, बेहडा, मोहगणी, भद्रक्ष, गोरखचिंच, शिवण, बकुळ यांसारख्या अनेक प्रजातींचा समावेश आहे. दर रविवारी स्थानिक युवक-युवती झाडांची छाटणी, स्वच्छता, औषध फवारणी, आळीपाळणी व पाणी देण्याचे कार्य निष्ठेने करतात. गेल्या पंधरा वर्षांपासून चालत असलेल्या या उपक्रमामुळे रुकडी, चोकाक, अतिग्रे या पंचक्रोशीतील हजारो झाडे मोठ्या प्रमाणात उगम पावली असून, सिमेंटच्या जंगलात हरवलेल्या या भागातील ग्रामस्थांना मोफत लाखो लिटर ऑक्सीजन मिळत आहे. या भेटीवेळी संस्थापक अध्यक्ष संदिप बनकर यांच्या आग्रहावरून प.पू. जगद्गुरू स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांनी ऑक्सीजन पार्कला शुभेच्छा देऊन आशीर्वाद दिला. यावेळी दिगंबर जैन पंचायतचे अध्यक्ष रविंद्र डिग्रजे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अनिल उपाध्ये, पत्रकार भगवान पोळ, सर्जेराव कांबळे, रुकडी पत्रकार संघाचे अध्यक्ष रोहण देसाई, तसेच पुष्पक पाटील, तात्यासो आलासे, जगदिश चौगले, मनोज परिट, ओंकार कुंभार आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यास जगाने स्वीकारले: प्रा. नितेश रायकर

**कोल्हापूर :** जागतिक वारसा स्थळांमधील महाराष्ट्रातील १२ गडकिल्ल्यांचा समावेश युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून केल्याने छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त महाराष्ट्राचेच नाही तर आत्ता जगाचे छत्रपती झाले. त्यांचे विचारकार्य जगाने सस्वीकारले असे प्रतिपादन मुरगुड येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्रा. नितेश रायकर यांनी केले. ते महावीर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग आयोजित विश्व पर्यटन दिनानिमित्त महाविद्यालयात बोलताना केले.



**कोल्हापूर : येथील महावीर महाविद्यालयात बोलताना प्रा. नितेश रायकर, डॉ . अंकुश बनसोडे, डॉ . महादेव शिंदे डॉ. प्रदीप गायकवाड आदी.**

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्रातील गडकोटांचा संघर्ष आजही आपल्याला प्रेरणादायी असल्याचे मत इतिहास विभाग प्रमुख डॉ. महादेव शिंदे यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अंकुश बनसोडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. चंद्रशेखर काटे यांनी केला, आभार डॉ. प्रदीप गायकवाड यांनी मानले. सूत्रसंचालन दीक्षा काशिद व पूजा राठोड यांनी केले. यावेळी भित्तीपत्रके प्रदर्शनही करण्यात आले.

यावेळी प्रा. उत्तम वडिंगेकर, प्रा. पियुष डहाळे, प्रा. अमित पाटील, प्रा. सुरज चौगुले, श्री . सचिन बराटे व विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंबा येथे डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसच्यावतीने विशेष स्वच्छता मोहिम

डी वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस तळसंदे येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने वन विभागाच्या सहकार्याने आंबा येथे विशेष स्वच्छता मोहिम राबवली. यावेळी 'स्वच्छ अंबा – सुंदर आंबा' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या मोहिमेत महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक, प्राध्यापक व अधिकारी सहभागी झाले होते.

गांधी जयंती आणि स्वच्छता पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर तसेच राष्ट्रीय सेवा योजना सप्ताह आणि वन्यजीव सप्ताहच्या पार्श्वभूमीवर या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या उपक्रमाचे उद्घाटन झाले. त्यानंतर आंबा घाट व आजूबाजूच्या पर्यटनस्थळी स्वच्छता उपक्रमाला सुरुवात झाली. या मोहिमेत स्वयंसेवकांनी रस्त्याच्या कडेने, जंगलाच्या काठावर, आणि पर्यटन स्थळांवर पडलेला कचरा गोळा केला. या उपक्रमात एकूण ३० ते ४० कचऱ्याच्या पिशव्या संकलित झाल्या. यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या, थर्माकोल, खाद्यपदार्थांचे रॅपर, तसेच तुटलेल्या बाटल्या आढळल्या.




**तळसंदे: राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयं सेवक विद्यार्थी सोबत प्रा केदार रेडेकर, श्री देवेंद्र भोसले व वनपाल संगम खुपसे, पी एन डफडे व इतर.**

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. केदार रेडेकर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी, स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी, आणि वन्यजीव संरक्षणाची जाणीव व्हावी हा आमचा उद्देश आहे. पर्यटकांनीही परीसर अस्वच्छ होणार नाही, पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

यावेळी वन्यजीव अभ्यासक देवेंद्र भोसले, वनविभाग अधिकारी एसीएफ कमलेश पाटील, आरएफओ उज्वला मगदूम, आरएफओ सुषमा जाधव , वनपाल पांडुरंग चव्हाण, वनरक्षक अफ्रीन देवळेकर व वैष्णवी संगम खुपसे, पी एन डफडे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज संजय पाटील, विश्वस्त पृथ्वीराज संजय पाटील आणि कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, संचालक डॉ. एस. आर. पावसकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# दौंडमधील पिरॅमिड हॉस्पिटलवर तातडीने कारवाई करा

## भाजप युवक अध्यक्ष ओमकार कड्डे यांचे उपसंचालकांकडे निवेदन

**दौंड पुणे (जिल्हा प्रतिनिधी - सदाशिव रणदिवे ) :** शहरातील पिरॅमिड हॉस्पिटल आणि डॉ. समीर कुलकर्णी यांच्या मार्फत सुरू असलेल्या कथित चुकीच्या आणि धोकादायक वैद्यकीय उपचारांविरोधात तातडीने कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी भाजप दौंड शहर युवक अध्यक्ष ओमकार कड्डे यांनी केली आहे. यासाठी त्यांनी आरोग्य सेवा पुणे मंडळाचे उपसंचालक डॉ. भगवान पवार यांच्याकडे औपचारिक निवेदन सादर केले आहे.



कड्डे यांनी निवेदनात नमूद केल्यानुसार, पिरॅमिड हॉस्पिटलमध्ये शेकडो रुग्णांवर चुकीच्या पद्धतीने शस्त्रक्रिया करण्यात आल्याची गंभीर माहिती समोर आली आहे. यामुळे रुग्णांचे प्राण संकटात येत असून, रुग्णांच्या जीविताशी खेळण्याचा प्रयत्न होत आहे. विशेष म्हणजे, शासकीय आरोग्य योजनांतर्गत मोफत उपचार मिळण्यास पात्र असलेल्या रुग्णांकडून हॉस्पिटलकडून अवैधरित्या पैसे आकारले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी गेल्या जुलै महिन्यापासून उपजिल्हा रुग्णालय दौंडचे अधीक्षक डॉ. सचिन गुजर आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने, आरोग्य प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचे कड्डे यांनी स्पष्ट केले.

ओमकार कड्डे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत: पिरॅमिड हॉस्पिटल व डॉ. समीर कुलकर्णी यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी.या गैरप्रकारात सहभागी असलेल्या प्रशासकीय डॉक्टरांवरही योग्य ती शिस्तभंगात्मक कारवाई करावी. सामान्य रुग्णांच्या जीवाशी खेळणारा हा अक्षम्य प्रकार आहे. याला वेळीच आळा घालून दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे, अशी ठाम भूमिका ओमकार कड्डे यांनी मांडली आहे.



**सातवे येथे विवेकानंद विद्या मंदिरमध्ये झालेल्या पालक मेळाव्याप्रसंगी समुपदेशक अशोक भोईटे यांचा सत्कार करताना सचिव दादा जाधव व इतर मान्यवर.**

## विवेकानंद विद्या मंदिर, सातवे येथे पालक मेळावा आणि सत्कार सोहळा

**सातवे (प्रतिनिधी) :** येथील विवेकानंद विद्या मंदिर व शिशुविहारमध्ये पालक मेळावा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शाळेच्या वतीने पालकांशी संवाद साधण्यात आला, तसेच विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी संस्थेचे पदाधिकारी व प्रमुख पाहुणे उपस्थित होते. शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात यश संपादन केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्तींमध्ये प्रसिद्ध समुपदेशक अशोक भोईटे (सेवावृत्तीबद्दल), डॉ. रोहन राजेंद्र बच्चे (एम.बी.बी.एस. पदवी पूर्ण), विभावरी पाटील (सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंता म्हणून निवड), पृथ्वीराज जाधव (बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये एम.बी.बी.एस. साठी निवड), तसेच विवेक बाबुराव आलुगडे (के.एम. कॉलेजमध्ये एम.बी.बी.एस. साठी निवड) यांचा समावेश होता. प्रसिद्ध समुपदेशक अशोक भोईटे यांनी 'पालक-पाल्य संवाद' या विषयावर पालकांना अत्यंत मार्मिक मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये पालकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, याचे विविध उदाहरणांद्वारे स्पष्टीकरण दिले. संस्थेचे कार्याध्यक्ष राजाराम शिनगारे यांनी भविष्यातील शैक्षणिक नियोजनावर विचार मांडले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष महिपती घाटगे, उपाध्यक्ष शिवाजी चव्हाण, सचिव दादा जाधव, सदस्य विलास पाटील, आनंदकुमार जाधव, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अश्विनी चव्हाण, वंदना पवार, श्वेता बच्चे, प्रतिभा वडिंगेकर, राजलक्ष्मी खाडे, मनीषा बच्चे, उमा पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन यशस्वीरित्या पार पडले, तर वंदना पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्यासह महावितरणला 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'

## नवी दिल्लीमध्ये राष्ट्रीय शिखर परिषदेत सन्मान : मान्यवरांची उपस्थिती

**मुंबई :** सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाच्या विद्युत क्षेत्रामध्ये विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना वैयक्तिक गटात वर्ष २०२५ साठी 'वूमन इन एनर्जी अवॉर्ड'ने तर कंपनी गटात महावितरणला 'एनर्जी कंपनी (पॉवर) अवॉर्ड'ने नवी दिल्ली येथील राष्ट्रीय एनर्जी लिडरशिप शिखर परिषदेत गुरुवारी (दि. २५) गौरविण्यात आले.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री ना. मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी या सन्मानाबद्दल अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र आणि सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

केंद्रीय नवीन व नवीकरणीय राज्यमंत्री ना. श्रीपाद नाईक आणि सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. अनिल राजदान यांच्याहस्ते अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. इकॉनॉमिक टाइम्सच्या वतीने आयोजित दोन दिवसीय वार्षिक शिखर परिषद २०२५ मध्ये ऊर्जा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा, खाण, पर्यावरण, वन आणि हवामान बदल आदी क्षेत्रातील सुमारे ५०० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींची उपस्थिती होती. या परिषदेत अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे महाराष्ट्रातील वीजक्षेत्राच्या सादरीकरणासह विशेष व्याख्यान झाले.




**राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना नवी दिल्ली येथे केंद्रीय नवीन व नवीकरणीय राज्यमंत्री ना. श्रीपाद नाईक, सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. अनिल राजदान यांच्याहस्ते ङ्गएनर्जी लिडरशिप अवॉर्ड २०२५फ्ने गौरविण्यात आले.**

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ऊर्जा परिवर्तनातून सर्व वीजग्राहकांसाठी फायदेशीर आमुलाग्र सुधारणांना वेग दिला आहे. त्यामुळे वीज दरात प्रथमच घट झाली असून येत्या पाच वर्षांत ते आणखी कमी होत जाणार आहे. जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. या योजनेमुळे महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत. या योजनेत आतापर्यंत २४५८ मेगावॅट क्षमतेचे ४५४ प्रकल्प पूर्ण झाले असून ६ लाखांवरील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे तर ३२ लाख एकर शेतजमीनीचे सौर ऊर्जेद्वारे सिंचन होत आहे.

यासोबतच सौर कृषिपंपाच्या विविध योजनेमधून राज्यात ६ लाख ४७ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले असून त्याद्वारे २१ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. सौर कृषिपंप बसविण्यामध्ये महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचनेनुसार ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. या नियोजनात हरित ऊर्जेवर अधिक भर देण्यात आला आहे. सन २०३० पर्यंत विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. सोबतच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाखांवर रोजगार निर्माण होणार आहेत. यासह पुढील पाच वर्षांत वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल. त्यामुळे येत्या पाच वर्षांत सर्वच वर्गवारीतील वीज दर कमी होत जाणार आहे. विद्युत क्षेत्रातील लोकाभिमुख विविध योजना व प्रभावी अंमलबजावणीमुळे प्रत्यक्षात झालेले विविध फायदे आदींच्या निकषांवर सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. अनिल राजदान यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय राष्ट्रीय निवड समितीने अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व महावितरणची 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड २०२५'साठी निवड केली आहे.

# मुंबईची जीवन वाहिनी लोकल ट्रेनमध्ये दसरा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा

वार्तापत्र

**चंद्रकांत काळे**

सत्याचा शिलेदार

प्रतिनिधी रायगड माथेरान...

मुंबईची जीवन वाहिनी समजली जाणारी लोकल ट्रेन या लोकल ट्रेन ने दररोज नित्य दिन लाखो कामगार प्रवासी आपल्या नोकरीसाठी व उद्योग व्यवसायासाठी मुंबईकडे नेत्यादिनी प्रवास करीत असतात आणि ही लोकल ट्रेन दररोज आपल्याला आपल्या नोकरीच्या ठिकाणापासून व्यवसायाच्या ठिकाणापासून आपल्या घरपर्यंत सुखरूप प्रवास माध्यमातून दररोज आपल्या कुटुंबामध्ये घेऊन येत असते व सुखरूप नोकरीच्या ठिकाणी व व्यवसायाच्या ठिकाणी घेऊन जात असते आणि म्हणूनच सामान्य नागरिकांना हा मुबलक दरातील प्रवास परवडत असून त्यांची उपजीविका व व्यावसायिक जीवन या लोकल ट्रेन वर आधारित असते आणि म्हणून दसरा या पवित्र सणानिमित्त जी लोकल ट्रेन आपल्याला वर्षभर सेवा देत असते अशा या लोकल ट्रेनमध्ये आपापल्या भोगीमध्ये प्रवासी करणारे कामगार म्हणजेच सात ५२ दरम्यान कर्जत ते मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पर्यंत धावणारी लोकल ट्रेन मध्ये प्रवास करणारे श्री रामकृष्ण हरी भजन मंडळाचे सर्व सदस्य प्रवासी यांनी लोकल ट्रेनमध्ये मोठ्या भक्ती भावाने महालक्ष्मी देवीच्या प्रतिमेचे पूजन करून महाअर्थीसह सर्व प्रवाशांना महाप्रसाद वाटेत आनंदोत्सव साजरा करून हिंदूंच्या पवित्र सण नित्यदिनीचे प्रवास करणारे प्रवासी रवी शिंदे



योगेश सोनवणे व अशोक तावडे यांच्या मार्गदर्शनातून शेकडो प्रवाशांच्या सह हा दसरा उत्सव साजरा करीत दसरा च्या हार्दिक शुभेच्छा देत दसरा उत्सव साजरा केला.

निवडक




## आदर्श गुरुकुल विद्यालयाला मिळाला राष्ट्रीय लघुनाटिकेत पाचवा क्रमांक

पेठ वडगाव : चेतना एम्पॉवरमेंट फाउंडेशन आणि हेमा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डिजिटल डिटॉक्स महोत्सव या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, ओडिसा, मध्य प्रदेश या पाच राज्यांतील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेच्या ७वी ते १०वी गटात आदर्श गुरुकुल विद्यालय व ज्युनि. कॉलेज, पेठ वडगाव यांनी राष्ट्रीय स्तरावर पाचवा क्रमांक प्राप्त करून विद्यालयाचा गौरव वाढविला.

स्क्रीन टाईम ने छीना बचपन या हिंदी लघुनाटिकेत सानिध्य अमर पवार, यश पुंडलिक चौधरी, सर्मथ मार्तंड बंडगर, पृथ्वीसिंह दिपक सांळूखे आणि वेदांत राम घाटगे यांनी उत्कृष्ट अभिनय व कौशल्य दाखवले. या लघुनाटिकेचे लेखन व दिग्दर्शन विद्यालयातील शिक्षक एस. पी. शिसोदे यांनी केले. स्पर्धेला प्रेरणा संस्था प्रमुख डॉ. डी. एस. घुगरे यांचे प्रोत्साहन मिळाले, तर मुख्याध्यापिका सौ. एम. डी. घुगरे यांचे मार्गदर्शन तसेच विद्यालयाचे पर्वक्षक एस. जी. जाधव यांचे सहकार्य लाभले.



## आदर्श गुरुकुलचा नाट्य महोत्सवात तृतीय क्रमांक

पेठ वडगाव : आदर्श गुरुकुल विद्यालय व ज्युनि. कॉलेजने जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य महोत्सवात तृतीय क्रमांक प्राप्त करून महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. सदर नाटकाचे लेखन व दिग्दर्शन एस पी शिसोदे यांनी केले, तर सहाय्यक दिग्दर्शन व्ही यू पाटील यांनी केले.

नाटकात विवेक विक्रांत रणभिसे (९ वी), धैर्यशील संतोष परमाळे (९ वी), संस्कार राजगोंडा पाटील (९ वी), सोहम प्रवीण भंडारी (९ वी), वेदांत उमेश चव्हाण (१० वी), कैवल्य दिगंबर किल्लेदार (७ वी), शुभम गुरुशांतया मठपती (७ वी) आणि इंद्रनील वैभव मेनकुदळे (७ वी) यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या.

या यशासाठी संस्थेचे संस्थापक डॉ. डी. एस. घुगरे व सचिव व मुख्याध्यापिका एम डी घुगरे यांची प्रेरणा मोठी ठरली. तसेच विद्यालयाचे प्रशासक एस. जी. जाधव आणि बी आर कांबळे यांचे सहकार्यही लाभले.



## किणी हायस्कूलचे २५ हून अधिक पदकांवर नाव

वारणा विद्यालय, वारणानगर येथे पार पडलेल्या हातकणंगले तालुकास्तरीय शासकीय मैदानी स्पर्धेमध्ये किणी हायस्कूलच्या १७ व १९ वर्षांखालील मुलींनी ५ हून अधिक पदके मिळवत घवघवीत यश संपादन केले. वैयक्तिक आणि सांघिक स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करत त्यांनी शाळेचा झेंडा तालुकास्तरावर अभिमानाने फडकावला.

१९ वर्षांखालील गटात विद्यार्थिनींनी सर्वाधिक पदकांची कमाई केली. प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंमध्ये: विभावरी मोहिते – ४०० मी. धावणे, कोमल जाधव – ८०० मी. धावणे, सिद्धी क्षीरसागर – १५०० मी. धावणे, हर्षदा माळी – ३००० मी. धावणे, पायल पाटील – ५००० मी. चालणे, ४÷१०० मी. रिले संघ, ४÷४०० मी. रिले संघ, द्वितीय क्रमांक विजेत्या: ऋतुजा कुंभार – १०० मी. धावणे, सिद्धी क्षीरसागर – २०० मी. धावणे, गौरी डोईफोडे – १५०० मी. धावणे, महेक महात – ३००० मी. चालणे, प्राची कुंभार – ५००० मी. चालणे, तृतीय क्रमांक – समीक्षा देसाई – १०० मी. धावणे, १७ वर्षांखालील गटात देखील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. पौर्णिमा घोलप – ३००० मी. धावणे – द्वितीय क्रमांक, स्नेहा पवार – ३००० मी. धावणे – चतुर्थ क्रमांक,ऐश्वर्या घोलप – ८०० मी. धावणे – तृतीय क्रमांक अरुंधती सावंत – ३००० मी. चालणे – तृतीय क्रमांक, ४÷१०० मी. रिले संघ – तृतीय क्रमांक, ४÷४०० मी. रिले संघ – तृतीय क्रमांक, या स्पर्धांमध्ये एकूण २५ पेक्षा जास्त पदकांची कमाई करत किणी हायस्कूलने तालुकास्तरावर आपली क्रीडा ताकद ठसठशीतपणे सिद्ध केली. या यशस्वी विद्यार्थिनींचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या यशामध्ये शाळेचे अध्यक्ष एन. आर. पाटील, उपाध्यक्ष बाळासो पाटील, सचिव राजेंद्र पाटील, मुख्याध्यापक बी. डी. मलगुंडे, पर्यवेक्षक डी. डी. चव्हाण, क्रीडा शिक्षक एस. के. धनवडे आणि पी. एन. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# कोल्हापूर मनपा शालेय हॉकी स्पर्धा उत्साहात

■ विवेकानंद कॉलेज (मुले), दत्ताबाळ इंग्लिश मीडियम (१७ वर्षे मुली), पद्माराजे गर्ल्स हायस्कूल (१९ वर्षे मुली) विजेत्या

कोल्हापूर – ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर रोजी मेजर ध्यानचंद हॉफिस स्टेडियमवर कोल्हापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मनपा स्तरावरील शालेय हॉकी स्पर्धा संपन्न झाली.

१७ वर्षे मुलांमध्ये विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने विमला गोएंका शाळेला २–० ने पराभूत करत विजेतेपद पटकावले. पियुष करडे आणि सार्थक राणे यांनी गोल केले. प्रशिक्षक संतोष कुंडले व साद मुजावर यांच्या नेतृत्वाखाली संघाने उत्कृष्ट कामगिरी केली.

१७ वर्षे मुलींच्या अंतिम सामन्यात दत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूलने महावीर इंग्लिश स्कूलला २–१ ने मात दिली. अनन्या माहिडक आणि तनिष्का संकपाळ यांनी गोल केले. प्रशिक्षक समीर भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने सामना जिंकला.

१९ वर्षे मुलींच्या अंतिम सामन्यात पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्यू कॉलेजला २–० ने पराभूत केले. परिणीता चव्हाण आणि इरा जाधव यांनी गोल करून विजयी संघाला विजयानंद मिळवून दिला. प्रशिक्षक महेश सूर्यवंशी आणि श्वेता पाटील यांनी संघाचे मार्गदर्शन केले.



स्पर्धांचे आयोजन सागर जाधव व क्रीडा निरीक्षक सचिन पांडव यांच्या देखरेखीखाली करण्यात आले.



## आदर्श गुरुकुल, ग्रीन व्हॅली शाळेची विभागीय रोलबॉल स्पर्धेसाठी निवड

पेठवडगाव : जिल्हास्तरीय शालेय रोलबॉल स्पर्धेत आदर्श गुरुकुल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच ग्रीन व्हॅली सार्वजनिक शाळेने उल्लेखनीय यश संपादन करत विभागीय स्पर्धेसाठी आपली घोडदौड कायम राखली आहे.

१९ वर्षांखालील गटात आदर्श गुरुकुल विद्यालयाच्या संघाने अप्रतिम खेळी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि विभागीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. १७ वर्षांखालील गटात ग्रीन व्हॅली स्कूलने जबरदस्त कामगिरी करत विजेतेपद मिळवले. त्याचबरोबर १४ वर्षांखालील गटातही ग्रीन व्हॅलीच्या संघाने दुसरा क्रमांक मिळवत आपली भक्कम उपस्थिती नोंदवली.या संघाचे प्रशिक्षक व्ही.ए. भातमारे आणि सौरभ पाटील यांचे मार्गदर्शन संघाच्या यशामागे मोलाचे ठरले.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी क्रीडा अधिकारी सुधाकर जमदार, बेसबॉल संघटनेचे सचिव राजेंद्र बनसोडे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. डी.एस. घुगरे, सचिव व मुख्याध्यापिका सौ. एम.डी. घुगरे, ग्रीन व्हॅलीचे मुख्याध्यापक व्ही.एस. डोईजड, प्रशासक एस.जी. जाधव, डे विभाग प्रमुख एस.ए. पाटील, रोलबॉल संघटनेचे सदस्य राहुल जोशी, जिमखाना विभाग प्रमुख एन.ए. कुपेकर आणि एस.एस. मदने आदी मान्यवर उपस्थित होते.

## एबीपी शिक्षण समूहाची तालुकास्तरीय खो–खो स्पर्धेत उज्वल कामगिरी, दोन संघांना जिल्हास्तरीय पात्रता



नवे पारगाव – महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन पेठ वडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय शासकीय हातकणंगले तालुकास्तरीय खो–खो स्पर्धेत एबीपी शिक्षण समूहाने जबरदस्त कामगिरी करत दोन संघांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र केले आहे.

वारणा विद्यानिकेतन व आबासाहेब पाटील ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, नवे पारगाव या संघाने १९ वर्षाखालील आणि १७ वर्षाखालील मुलांच्या गटात प्रथम क्रमांक पटकावला तर १४ वर्षाखालील गटात तृतीय क्रमांक मिळविला. एकाच वेळी दोन संघ जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र होणे ही उल्लेखनीय कामगिरी ठरली आहे.

१७ वर्षांच्या गटात अंतिम सामन्यात ग्रीन वॅली पेठवडगाववर व १९ वर्षांच्या गटात बळवंतराव यादव पेठ वडगाववर विजय मिळविला. १४ वर्षांच्या गटात सेमी फायनलमध्ये गुरुदेव नॉलेज सिटी स्कूल तारदाळविरुद्ध एक गुणाने पराभव झाला, त्यामुळे तृतीय क्रमांक मिळाला.

१९ वर्षांच्या संघात संयम मगदूम, अक्षय केदार, रोहित कार्वेकर, हर्षवर्धन गायकवाड, सोमनाथ नलवडे, अनिरुद्ध कुंभार यांची झळकती कामगिरी होती तर १७ वर्षांच्या गटात अनिकेत काळे, पारस मोरे, आर्यन सूर्यवंशी, कुणाल सावंत, कृष्णा वाघमारे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

सर्व यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षिका संगीता सकटे व क्रीडा प्रमुख गोरक्ष सकटे यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ए बी पाटील, सचिव अमोल कुमार पाटील, सचिव राजलक्ष्मी पाटील, संचालिका आकांक्षा पाटील, शाळेचे प्राचार्य एस आर पाटील, जूनियर विभाग प्रमुख माळी, वस्तीगृह अधीक्षक मोहन पाटील मेजर, वरिष्ठ क्रीडा प्रशिक्षक सतिश पाटील, वस्तीगृह प्रमुख अक्षय देशमुख आदी उपस्थित होते.



## आदर्श गुरुकुल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, पेठ वडगावचा जिल्हास्तरीय बेसबॉल स्पर्धेत तिहेरी मुकुट

पेठवडगाव (ता. हातकणंगले) : येथील आदर्श गुरुकुल विद्यालय व ज्युनिअर कॉलेजने दिनांक १७ व १८ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील आणि १९ वर्षाखालील मुलांच्या गटांमध्ये अनुक्रमे विजेतेपद पटकावले आणि तिहेरी मुकुट मिळवला आहे. या घवघवीत यशामुळे सदर तीनही संघांची शालेय विभागीय बेसबॉल स्पर्धेसाठी निवड झाली असून, शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील हे एक अत्यंत गौरवाचे यश मानले जात आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल सर्व खेळाडूंचे, प्रशिक्षकांचे व मार्गदर्शकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. या यशामागे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. डी. एस. घुगरे, सचिव व मुख्याध्यापिका एम. डी. घुगरे, प्रशालेचे प्रशासक एस. जी. जाधव, डे विभागाचे प्रशासक एस. ए. पाटील, ज्युनिअर कॉलेजचे प्रशासक एस. एस. चित्ते, ग्रीन व्हॅली पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक डोईजड, आदर्श गुरुकुल विद्यालयचे जिमखाना प्रमुख एन. ए. कुपेकर, ग्रीन व्हॅली पब्लिक स्कूलचे जिमखाना प्रमुख व राष्ट्रीय प्रशिक्षक एस. एस. मदने, सहायक प्रशिक्षक व्ही. ए. भातमारे तसेच सर्व क्रीडा शिक्षकांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले.

## रायफल शूटिंग : आदर्श गुरुकुल विद्यालयाचे भरघोस यश

पेठ वडगाव : कोल्हापूर येथे पार पडलेल्या शालेय जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत आदर्श गुरुकुल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, तसेच ग्रीन व्हॅली पब्लिक स्कूल, पेठ–वडगाव येथील विद्यार्थ्यांनी शानदार कामगिरी करत गौरव प्राप्त केला. कु. सोहम संदेश पाटील (इयत्ता १०वी, इंग्रजी माध्यम) – प्रथम क्रमांक, कु. तेजस हंबीरराव पाटील (इयत्ता १२वी, निवासी) – द्वितीय क्रमांक, कु. वीर प्रवीण पाटील (ग्रीन व्हॅली पब्लिक स्कूल) – तृतीय क्रमांक, या तिघा विद्यार्थ्यांची पुढील विभागीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाली असून, त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गुरुकुल परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. या यशस्वी कामगिरीमागे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. प्रा. डॉ. डी.एस. घुगरे , सचिव व मुख्याध्यापिका सौ. एम.डी. घुगरे मॅडम, पर्यवेक्षक श्री. एस.जी. जाधव सर, कॉलेज विभाग प्रमुख श्री. एस.एस. चित्ते , ग्रीन व्हॅलीचे मुख्याध्यापक श्री. व्ही.एस. डोईजड , डे–विभाग प्रमुख श्री. एस.ए. पाटील , जिमखाना प्रमुख श्री. एन.ए. कुपेकर , श्री. एस.एस. मदने , अधीक्षक श्री. झरेकर , व प्रशिक्षक श्री. विश्वजीत कांबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



# विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी पालक-शिक्षक सुसंवाद अत्यावश्यक

### प्रा. डॉ. जी. व्ही. खाडे यांचे पालक–शिक्षक–विद्यार्थी सहविचार सभेत प्रतिपादन

कोल्हापूर : मोबाईल आणि समाजमाध्यमांच्या अति वापरामुळे आजची विद्यार्थी पिढी दिशाहीन होत आहे. त्यामुळे त्यांचे करिअर घडवताना शिक्षणाबरोबरच सुसंस्कारही तितकेच महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध करून त्यांचे भविष्य उज्वल करण्यासाठी पालक व शिक्षक यांच्यातील सुसंवाद अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जी. व्ही. खाडे यांनी केले.

भवानी मंडपातील जिल्हा परिषद कोल्हापूर संचलित मेन राजाराम हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या ऐतिहासिक सभागृहात पार पडलेल्या पालक–शिक्षक–विद्यार्थी सहविचार सभेत ते बोलत होते.



सभेत पुढे बोलताना प्राचार्य डॉ. खाडे म्हणाले की, पालक सभा म्हणजे केवळ औपचारिकता नसून, विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारा प्रेरणादायी क्षण आहे. शिक्षण हे फक्त पुस्तकी ज्ञान नव्हे, तर जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचे साधन आहे. 'जिथे मेहनत, तिथे यश' या विचाराने विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास ठेवून वाटचाल करावी.

प्रशालेतील अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने देशाच्या उभारणीत योगदान दिले आहे. त्यांचा वारसा पुढे नेत समाजउन्नतीसाठी कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सभेत शाळेच्या प्रगती, शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, सहशालेय उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर सविस्तर चर्चा झाली.

पालकांनी शाळेच्या कार्याची प्रशंसा करत काही सकारात्मक सूचना दिल्या. यावेळी उपप्राचार्या श्रीमती व्ही. ए. खडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. बी. पी. माळवे, वर्गशिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व स्वागत प्रा. बी. पी. माळवे यांनी केले.